पोलीस आयुक्तालय ,अमरावती
दिनांक १७.११.२०२१

## – प्रेस नोट –

दिनांक १३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामधे अचानक जमावाने हिंसक वळण घेउन व शहरामध्ये तोडफोड सुरु केली होती.त्यामध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होवुन जिवीत हानी होण्याची सकृत दर्शनी परिस्थिती निर्माण झालेली होती.

अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कलम–१४४ जाफौ.प्रमाणे संपुर्ण संचारबंदीचे ( कर्फ्यु ) आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. अमरावती शहरामधिल विद्यार्थ्यांना परीक्षा फॉम भरावयाकरिता आवागमन करणारे विद्यार्थ्यांना संचारबंदीमध्ये शिथिलता देणे आवश्यक असल्याने त्यांना दिनांक १७.११.२०२१ **रोजीपासुन परीक्षा फॉर्म भरण्याकरिता** सुट देण्यात येत असल्याचे मा. डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी आदेश पारित केलेले आहे.

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन मा. डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती